Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ११, अंक ४१]   गुरूवार ते बुधवार, नोव्हेंबर ६-१२, २०२५/ कार्तिक १५-२१, शके १९४७ [पृष्ठे १२, किंमत : रुपये ११.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग एक-अ-नागपूर विभागीय पुरवणी

———————

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

———————

भाग १-अ(ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३२१.

**संचालक, नगर रचना, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.**

**आदेश**

क्रमांक डि.टी.पी.-वि.यो.मोहपा-कलम-१२७(२)आदेश-टिपीव्ही-२-५९२६-२०२५.—

ज्याअर्थी, मोहपा नगर परिषदेची सुधारित विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महा. ३७ वा) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिले आहे) चे कलम ३१ (१) मधील तरतुदीनुसार शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीएस-२४१२-७४-सीआर-३१(ए)-२०१२-युडी-९, दि. ३१ मार्च, २०१२ अन्वये (यापुढे "उक्त अधिसूचना" असे संबोधिले आहे) भागशः मंजूर झाली असून, ती दि. १५ मे, २०१२ पासून अंमलात आलेली आहे; तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस-२४१२-७४-सीआर-३१-२०१२-युडी-९, दि. २० जानेवारी, २०१५ अन्वये मंजूर झाली असून, ती दि. २० फेब्रुवारी, २०१५ पासून अंमलात आली आहे. (यापुढे “उक्त मंजूर विकास योजना” असे संबोधिले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेमध्ये, मौजा मोहपा येथील स. क्र. ५००, ५०१ व ५०२ या जमिनींपैकी क्षेत्र आरक्षण क्र. ११, आठवडी बाजार व दुकान संकुल या आरक्षणाने बाधित होत असून (यापुढे “उक्त आरक्षण” असे संबोधिले आहे) उक्त आरक्षणाच्या भूसंपादन व विकासासाठी नियोजन व समुचित प्राधिकरण नगरपरिषद, मोहपा आहे (यापुढे “उक्त समुचित प्राधिकरण" असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त समूचित प्राधिकरणाने उक्त मंजूर विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून १० (दहा) वर्षाच्या कालावधीत उक्त आरक्षणहिंखालील जमिनी संपादन केलेल्या नाहीत;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाखालील मौजा मोहपा येथील स. क्र. ५००, ५०१ व ५०२ या जमिनीपैकी 'आरक्षण क्र.११, आठवडी बाजार व दुकान संकुल' या आरक्षणाने बाधित क्षेत्राबाबत (यापुढे "उक्त जमिनी" असे संबोधिले आहे) संबंधित जमिनमालक यांनी (यापुढे "उक्त जमिन मालक" असे संबोधिले आहे) उक्त अधिनियमाचे कलम १२७(१) चे तरतुदीनुसार उक्त समुचित प्राधि-करणावर दि. १६ एप्रिल, २०२२ रोजी सूचना (यापुढे "उक्त सूचना" असे संबोधिले आहे) बजाविली होती व ती समूचित प्राधिकरणास दि. १९ मे, २०२२ रोजी प्राप्त झाली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनमालकांनी उक्त सूचना बजाविल्याच्या दिनांकानंतर उक्त नियोजन प्राधिकरणाने विहीत मुदतीत उक्त आरक्षणाखालील उक्त जमिन संपादित केली नाही. अथवा, उक्त जमिनीचे भूसंपादन करण्यासंबंधी उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) चे तरतुदीनुसार आवश्यक ती उपाययोजना केलेली नाही;

आणि ज्याअर्थी, सहायक संचालक, नगर रचना, नागपूर शाखा, नागपूर यांचेकडील पत्र क्र. १९६४, दि. २१ जुलै, २०२५ अन्वये, 'मा. उच्च न्यायालयाने पारित केलेल्या आदेशानुसार मौजा मोहपा येथील स. क्र. ५००, ५०१ व ५०२ येथील आरक्षण क्र. ११ " आठवडी बाजार व दुकान संकुल" ही आरक्षणे व्यपगत झाले असुन, उक्त आरक्षणे व्यपगत झाल्याबाबत अधिसूचना मा. उच्च न्यायालयानी पारित केलेल्या दि. २४ मार्च, २०२५ रोजीच्या आदेशापासुन पुढील ०४ आठवड्यात म्हणजेच दि. २३ एप्रिल, २०२५ पर्यंत निर्गमित करण्याचे निर्देशित केलेले आहे. वरील बाबीचा विचार करुन मुख्याधिकारी, नगर परिषद, मोहपा यांनी त्यांचे अहवालात नमुद केल्यानुसार तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांचे आदेशाचे अनुषंगाने मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे स्तरावरुन कलम १२७ (२) अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे.', असे कळविले आहे;

आणि ज्याअर्थी, सहसंचालक, नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडील पत्र क्र. १२२६, दि.०८ ऑगस्ट, २०२५ अन्वये अहवाल सादर करून अंतिमतः, 'उच्च न्यायालयाकडील दि. २४ मार्च, २०२५ रोजीचे आदेशाचे अनुषंगाने उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) अन्वये अधिसूचना निर्गमीत करण्यास हरकत नाही.'. असे कळविले आहे;

आणि ज्याअर्थी, रिट याचिका क्र.४६८६/२०२४ मध्ये, मा. उच्च न्यायालय मुंबई, नागपूर खंडपीठ, नागपूर यांनी दि. २४ मार्च, २०२५ रोजी उक्त आरक्षण व्यपगत झाले असल्याचे आदेश पारित केले आहेत. सदर आदेशान्वये मा. उच्च न्यायालयाने मौजा मोहपा येथील स. क्र. ५००, ५०१ व ५०२ या जमिनींपैकी क्षेत्रावरील 'आरक्षण क्र.११, आठवडी बाजार व दुकान संकुल' हे आरक्षण व्यपगत झाल्याची अधिसूचना उक्त आदेशाच्या दिनांकापासून चार आठवड्यांच्या आत निर्गमित करणेबाबत प्रतिवादी क्र. १ (महाराष्ट्र शासना-तर्फे, मा. अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई) यांना आदेशित केले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनींवरील उक्त आरक्षणाबाबतची उपरोक्त नमूद वस्तुस्थिती पाहता, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीनुसार उक्त जमिनीचे क्षेत्रावरील उक्त आरक्षण व्यपगत झाल्याबाबतचे आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे, असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाकडील निर्णय क्र.टिपीएस-१८१३/३२११/ प्र.क्र.५०८/नवि-१३, दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ अन्वये नियोजन प्राधिकरण असलेल्या सर्व नगर परिषदा / नगर पंचायती / जिल्हा परिषदा यांच्या विकास योजने-संबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीनुसार कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार कलम १५१ चे तरतुदीनुसार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केले आहेत;

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीनुसार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे, या आदे-शाद्वारे पुढील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत झाले आहे, असे अधिसूचित करीत आहेत आणि त्यासाठी उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहेः-

उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेच्या बदलांच्या परिशिष्टामधील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नविन नोंदीचा समावेश करण्यात येत आहे :-

**परिशिष्ट**

| अ. क्र. | नगर परिषद मौजा, तालुका व जिल्हा | उक्त मंजूर विकास योजनेतील प्रस्ताव व वि.यो. अहवालानुसार अंदाजे क्षेत्र | जमिनीचा तपशील | उक्त आरक्षणातून व्यपगत झाले अंदाजे क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १. | मोहपा नगर परिषद मौजा मोहपा, ता. कळमेश्वर, जि. नागपूर. | आ. क्र.११, आठवडी बाजार व दुकान संकुल | स. क्र. ५००, ५०१, ५०२ | आरक्षणाने बाधित क्षेत्र |

**टीप :-** १. उक्त जमिन मालकांनी उक्त सूचनेंतर्गत उक्त जमिनींचे मूळ मोजणी नकाशे सादर केले नसल्याने, आरक्षणाखालील क्षेत्राबाबत भविष्यात कोणताही वाद अगर तक्रार उद्‌भवल्यास त्यास उक्त जमिन मालक जबाबदार राहतील.

२. सदरच्या आदेशाच्या अनुषंगाने भाग नकाशे अधिप्रमाणित करण्यापूर्वी उक्त व/किंवा संबंधित जमिन मालकांनी सूचनेखालील उक्त जमिनींचे भूमी अभिलेख विभागाकडील अद्ययावत व प्रमाणित मोजणी नकाशे सादर करणे आवश्यक राहतील.

३. उक्त आरक्षणांतून मुक्त झालेल्या उक्त जमिनींच्या लगतच्या जमिनीवर उक्त मंजूर विकास योजनेनुसार अनुज्ञेय होणाऱ्या विकासाच्या प्रयोजनासाठी उक्त जमिन मालकांना उपलब्ध होईल.

४. उक्त आरक्षणांतून मुक्त झालेल्या उक्त जमिनींचे क्षेत्र दर्शविणारा उक्त मंजूर विकास योजनेचा भाग नकाशा हा मुख्याधिकारी, मोहपा नगर परिषद, कळमेश्वर, जि. नागपूर यांच्या कार्यालयात, कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत, नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

५. सदर आदेश संचालनालयाचे **www.dtp.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

**जितेंद्र ल. भोपळे,**
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणेः
दिनांक ७ ऑक्टोबर, २०२५.

―――――

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३२२.

BY DIRECTOR OF TOWN PLANNING

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

*ORDER*

No. D.T.P-D.P. -Mohpa-Sec-127(2)-Order-TPV-II-5926-2025.—

Whereas, the Development Plan of Mohpa Municipal Council has been sanctioned as per the provisions of section 31 (*1*) of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (Mah. Act XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") by the Government in Urban Development Department *vide* Notification No. TPS-2412-74-CR-31A-2012-UD-9, dated 31st March, 2012 (hereinafter referred to as "the said Notification") & has come into force with effect from dt. 15th May, 2012, (hereinafter referred to as "the said Sanctioned Development Plan"). Also, the Development Plan of the excluded area has been sanctioned by the *vide* Notification No. TPS-2412-74-CR-31-2012-UD-9. dt. 20th January, 2015 and it has come into effect from 20th February, 2015;

And whereas, as per the Sanctioned Development Plan, the part area of land bearing S. No. 500, 501 & 502 at of Mouja Mohpa is affected by Reservation No. 11, Weekly Market & Shopping Centre (hereinafter referred to as "the said Reservations") and the Planning and Appropriate Authority for the acquisition and development of the said Reservstion is the Municipal Council, Mohpa (hereinafter referred to as "the said Appropriate Authority");

And whereas, the land affected by the said Reservation have not been acquired by the said Appropriate Authority within 10 (ten) years from the date on which the said Sanctioned Development Plan come into force;

And whereas, the concerned land owner (hereinafter referred to as "the said Land Owner") of the Land bearing S. No. 500, 501 & 502 at Mouja Mohpa had served a notice dt. 16th April, 2022 in respect of the land affected by the said Reservations (hereinafter referred to as "the said Land"), as per the provisions of section 127(*1*) of the said Act, (hereinafter referred to as "the said Notice") on the said Appropriate Authority and same has been received by the Appropriate Authority 19th May, 2022;

And whereas, the said Land under the said Reservation is not acquired or no steps as required as per the provisions of section 127(*1*) of the said Act have been taken by the Planning Authority within the stipulated period from the date of service of the said notice by the said land owner as per the provisions of section 127 of the said Act;

And whereas,the Assistant Director of Town Planning, Mohpa Baranch, Mohpa *vide* letter No. 1964, dt. 21st July, 2025 has submitted report stating that, 'As per the order pased by the Hon'ble High Court, the Reservation on Survey No. 500, 501 & 502 at Mouja Mohpa, Reservation No. 11 "Weekly Market and Shopping Complex" has lapsed. And a Notification regarding the lapsed Reservation has to be issued within the next 04 weeks i.e. by 23rd April, 2025 as per the order passed by the Hon'ble High Court dated 24th March, 2025. As mentioned in the report of the Chief Officer, Municipal Council, Mohpa by considering the above matter, and in accordance with the order of the Hon'ble Bombay High Court, Nagpur Bench, Nagpur, it is necessary to take action as per the provisions of Section 127 (*2*), at the level of the Hon'ble Director, Town Planning Department, Maharashtra State, Pune.';

And whereas, the Joint Director of Town Planning, Nagpur Division, Nagpur, *vide* letter No. 1964 dated 21st July, 2025, has submitted a report and finally stated that, there is no objection to issuing a Notification as per the provisions of section 127 (2) of the said Act in accordance with the order of the Hon'ble High Court dated 24th March, 2025.,';

And whereas, in Writ Petition No. 4686/2024, the Hon'ble High Court of Mumbai, Nagpur Bench, Nagpur has passed an Order on 24th March,.2025 that, the said Reservation has lapsed. By virtue of the said Order, the Hon'ble High Court has directed the Respondent No. 1 (The State of Maharashtra through its Secretary, Urban Development Department, Mantralaya, Mumbai) to issue a Notification of lapsing of the Reservation No. 11. Weekly Market and Shopping Complex' on the lands at S. No. 500, 501 and 502 of Mauja Mohpa within four weeks from the date of the said order;

And whereas, in view of the above stated facts regarding the said Reservation on the said land in the said Sanctioned Development Plan, the Director of Town Planning, Maharashtra State. Pune

is of the opinion that it is necessary to issue an order regarding the lapsing of the said Reservation on the said land as per the provisions of section 127(*2*) of the said Act;

And whereas, the Government in Urban Development Department as per the provisions of section 151 of the said Act, vide Resolution No.TPS-1813/3211/CR- 508/UD-13, dt.01st December, 2016, has delegated the powers exercisable by it as per the provisions of section 127 (*2*) of the said Act, in respect of Development Plans of all Municipal Councils / Nagar Panchayat and for the Development Plans undertaken by Zilla Parishad as a Planning Authority, to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune:

Now therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, by this order and as specified in the Schedule hereinafter hereby notify the lapsing of the said Reservation in respect of the said land as per the provisions of section 127(*2*) of the said Act & for that purpose amends the said Notification of the said Sanctioned Development Plan, as follows-

After the last entry in the Schedule of Modifications accompanying the said Notification of the said sanctioned Development Plan, the following new entry shall be added:-

SCHEDULE

| Sr. No. | MunicipalCouncil Mouza, Taluka and District | Proposal in the said sanctioned Development Plan & its Approxi. Area as per D.P. Report | Description of the Land | Approximate Area lapsed of the said Reservation (sq. mt.) |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| 1. | Mohpa MunicipalCouncil. Mouza Mohpa, Tal. Kalameshwar,Dist.Nagpur. | Reservation No. 11. WeeklyMarket and Shopping Complex | S. No. 500, 501 & 502 | Affected Land |

*Note:-*

1. As the said land owners have not submitted the original demarcation map of the said lands under the notice, the said land owners will be responsible for any future dispute or complaint regarding the area under Reservation.
2. Before certifying the part plan in accordance with the said order, the said and/or land owners will be required to submit updated and certified demarcation maps of the Land Records Department for the said lands under the notice.
3. The said Lands so released from the said Reservation shall become available to the said Land Owners for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent Land under the said sanctioned Development Plan.
4. A copy of the part plan of the said sanctioned Development Plan showing the area of the said Lands which is lapsed from the said Reservation is available in the office of the Chief Officer, Municipal Council, Mohpa, District Nagpur during office hours on all working days for

inspection to public upto one month.

5. This Order shall also be published on the Directorate's official website. *www.dtp.maharashtra.gov.in.*

Pune :
Dated the 7th October, 2025.

JITENDRA L. BHOPLE,
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

---

भाग १-अ(ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३२३.

**सदस्य सचिव, प्रस्ताव छाननी समिती तथा सहसंचालक, नगर रचना, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २० (४) अन्वये अधिसूचना**

क्रमांक कलम २०(४)-प्रा.यो. नागपूर-मौ. परसोडी (उटी)-ता. उमरेड-स.क्र. २२-१ (भाग), २२-२ (भाग), २२/३, २२/४, २२/५, २२/६, २२/७ व २३(भाग)-सहसंचानाग-१६४६-२०२५.—

ज्याअर्थी, नागपूर प्रदेशाची सुधारित प्रादेशिक योजना ( यापूढे "उक्त प्रादेशिक योजना" असे संबोधले आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७) (यापूढे "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे) चे कलम १५ अन्वये शासन अधिसूचना नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४९६-१५०५- प्र.क्र.२७३-९६-नवि-९, दिनांक ६ मे, २००० अन्वये मंजूर झाली असून ती दिनांक १५ जुलै, २००० पासून अंमलात आली आहे;

आणि ज्याअर्थी, राज्यात मंजूर असलेल्या प्रादेशिक योजनांमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २० अन्वये वेळोवेळी कराव्या लागणाऱ्या जमीन वापराच्या फेरबदलासंदर्भाने करावयाच्या कार्यपद्धतीबाबत उक्त अधिनियमाचे कलम १५४ अन्वये शासन निर्णय क्र. टिपीएस- १८१५-प्र.क्र.४९-१५-नवि-१३, दिनांक ६ मे, २०१५ अन्वये शासनाने निदेश दिलेले आहेत व शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१५-प्र.क्र.४९-१५-नवि–१३, दिनांक ४ जानेवारी, २०१५ अन्वये उक्त कार्यपद्धतीसंबंधी सुधारित कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५१ (१) अन्वये प्राप्त शक्तीचा वापर करून, शासनाचे समक्रमांकाचे दिनांक ६ मे, २०१५ चे अधिसूचने अन्वये उक्त अधिनियमाचे कलम २० (३) व २० (४) चे शासनाने वापरावयाचे अधिकार, उक्त अधिसूचनेत नमूद अटींचे अधिन राहून, नागपूर प्रशासकीय विभागाकरीता सहसंचालक नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर यांना प्रदान केलेले आहेत;

आणि ज्याअर्थी, मंजूर नागपूर प्रादेशिक योजनेत मौजा-परसोडी (उटी), तालुका उमरेड, जिल्हा नागपूर येथील स.क्र. २२/१(भाग), २२/२ (भाग), २२/३, २२/४, २२/५, २२/६, २२/७ व २३ (भाग) एकूण क्षेत्र १४.९८ हे. आर जागा (या पुढे ज्यास "उक्त क्षेत्र" असे संबोधले आहे) कृषी/फळबाग विभागात समाविष्ट आहे;

आणि ज्याअर्थी, आवश्यक त्या चौकशीनंतर व मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेऊन उक्त अधिनियमाचे कलम २० पोटकलम (२) मधील तरतुदीनुसार उक्त क्षेत्र " कृषी/फळबाग" विभागातून वगळून, उपरोक्त शासन निर्णयातील शर्ती व अधिमूल्य भरण्याचे अटींचे अधीन राहून, "रहिवास" विभागात समाविष्ट करणे आवश्यक असल्याचे उक्त शासन निर्णयान्वये गठीत "प्रस्ताव छाननी समिती" चे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम-२० च्या पोट कलम-३ मधील तरतुदीनुसार उक्त प्रस्तावित फेरबदल प्रस्तावाबाबत सहसंचालक नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर यांनी सूचना क्र.प्रा.यो.नागपूर/फेरबदल/कलम-२०(३)/मौ. परसोडी (उटी)/ता. उमरेड/गट नं. २२/१ (भाग), २२ / २ (भाग), २२/३, २२/४, २२/५, २२/६, २२/७ व २३(भाग)/ सहसंचानाग/२२२, दिनांक १२.फेब्रुवारी, २०२५ अन्वये सर्वसामान्य नागरीकांच्या सूचना/हरकती मागविण्यासाठी नोटीस महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-अ, नागपूर विभागीय पुरवणी दिनांक फेब्रुवारी २७, मार्च ५, २०२५ चे पृष्ठ क्र. ९ ते ११ वर तसेच दिनांक ५ मार्च, २०२५ रोजीचे 'युवाराष्ट्र दर्शन' या मराठी वृत्तपत्रात व दिनांक ५ मार्च, २०२५ रोजीचे 'लोकमत टाईम्स' या इंग्रजी वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात

आली आहे; आणि प्राप्त होणाऱ्या सूचना/हरकतींवर सबंधितांना सुनावणी देऊन अहवाल सादर करण्याकरीता सहायक संचालक, नगर रचना, शाखा कार्यालय, नागपूर यांना प्राधिकृत करण्यात आले होते. (यापुढे ज्यांचा उल्लेख "प्राधिकृत अधिकारी" असा करण्यात आला आहे.);

आणि ज्याअर्थी,उक्त प्राधिकृत अधिकारी यांचे कडील प्राप्त अहवालानुसार विहीत मुदतीत हरकती/सूचना प्राप्त झालेल्या नाहीत व त्यामुळे प्रस्ताव छाननी समितीच्या दिनांक १५ जुलै, २०२५ रोजी झालेल्या बैठकीत उक्त जमीन काही अटी व शर्ती सापेक्ष "कृषी /फळबाग विभागातून" वगळून "रहिवास विभागात" समाविष्ट करणेबाबत निर्णय घेण्यात आला आहे;

आणि ज्याअर्थी, मौजा-परसोडी (उटी), तालुका उमरेड, जिल्हा नागपूर येथील स.क्र. २२/१ (भाग), २२/२ (भाग), २२/३, २२/४, २२/५, २२/६, २२/७ व २३ (भाग) जागेचे जमीन धारकांनी या संबंधाने विहीत अधिमुल्याचा शासकीय कोषागारात भरणा केलेला आहे;

त्याअर्थी, शासनाने प्रदान केलेल्या अधिकारानुसार, सहसंचालक नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर हे उक्त अधिनियमाचे कलम २० (४) अन्वये उक्त प्रस्तावित फेरबदलास मंजुरी देत आहेत आणि त्यासाठी उक्त प्रादेशिक योजना मंजुरीच्या दिनांक ६ मे, २००० च्या अधिसूचने सोबत जोडलेल्या फेरबदलाच्या अनुसूचीमध्ये, शेवटच्या नोंदीवर, खालीलप्रमाणे बदलाची नोंद घेण्याचे निदेश देत आहे;

**नोंद**

मौजा- परसोडी (उटी), ता. उमरेड, जि. नागपूर येथील स.क्र. २२ / १ (भाग), २२/२ (भाग), २२/३, २२/४, २२/५, २२/६५ २२/७ व २३(भाग) एकूण क्षेत्र १४.९८ हे. आर ही जागा नकाशात दर्शविल्याप्रमाणे "कृषी/फळबाग विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहे." खालील नमूद अटी व शर्ती लागु राहतील.

**अटी व शर्ती :-**

१. एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR ) मधील प्रादेशिक योजनांसाठी नियमानुसार किमान १० % खुली जागा व १०% सुविधा क्षेत्र सोडणे आवश्यक राहील.

२. सदर जागेवरील संभाव्य लोकसंख्येकरीता आवश्यकतेप्रमाणे पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्धता करणे ही जमीन मालकांची जबाबदारी राहील. त्याकरिता, वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा नागपूर यांचे पत्र क्र. २००७, दिनांक ३१ डिसेंबर, २०२४ मध्ये स.क्र. २२/२ नाल्याच्या काठावर १ विहीर अस्तित्वात आहे, सदर विहिरीपासून ३ लक्ष लिटर/प्रति दिन भूजलाची उपलब्धता होऊ शकेल. सदर विहिरी मध्ये ४-६ आडवी इंधन छिद्रे घेणे व उर्वरित भूजल उपलब्धतेसाठी १ नवीन विंधन विहीर घेतल्यास ४-४.५ लक्ष लिटर/प्रति दिन अपेक्षित भूजलाचा पुरवठा होईल, असे नमूद आहे. त्याची पूर्तता अर्जदाराने केल्यानंतर, जिल्हाधिकारी नागपूर यांची खात्री झाल्यानंतरच अंतिम अभिन्यास मंजूर करावा.

३. पायाभूत सुविधा जमीन मालकांनी/विकासकर्त्यांनी जिल्हाधिकारी नागपूर ठरवतील त्या मानकांनुसार स्वतःचे खर्चाने विकसित करणे व पुरविणे बंधनकारक राहील.

४. अर्जदाराचे अर्जासह संलग्नीत, शासन नगर विकास विभागाकडील दिनांक ६मे, २०१५ रोजीच्या शासन निर्णयासोबतच्या "अनुसूची-क" अन्वये सादर केलेल्या बंधपत्रात नमूद केल्याप्रमाणे अभिन्यासातील भूखंड/सदनिका यांच्या विक्रीची सांगड घालण्यासाठी विहीत केलेल्या खालीलप्रमाणे अटी लागू राहतील :-

| | | |
|---|---|---|
| (अ) | अभिन्यास अंतिमतः मंजूर झाल्यावर | एकूण २५% भूखंड / सदनिका विक्री अनुज्ञेय राहील. |
| (ब) | सुमारे ४०% मुलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | एकूण ५०% भूखंड / सदनिका विक्री अनुज्ञेय राहील. |
| (क) | सुमारे ६०% मुलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | एकूण ७५% भूखंड / सदनिका विक्री अनुज्ञेय राहील. |
| (ड) | सुमारे ८०% मुलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | एकूण ९०% भूखंड / सदनिका विक्री अनुज्ञेय राहील. |
| (इ) | सुमारे १००% मुलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | एकूण १०० % भूखंड / सदनिका विक्री अनुज्ञेय राहील. |

५. विषयांकित फेरबदलाखालील जमिनीमध्ये समूह गृहबांधणी योजना विकसित करावयाची असेल तर, जिल्हाधिकारी, नागपूर यांनी विहीत केल्यानुसार सर्व मूलभूत सुविधा विकसित झाल्याशिवाय जमीन मालक/विकासकर्ता यांना भोगवटा प्रमाणपत्र देता येणार नाही.

उक्त मंजूर फेरबदल दर्शविणारा नकाशा खालील कार्यालयात कार्यालयीन वेळेत एक महिन्याचे कालावधीकरीता नागरीकांच्या अवलोकनार्थ उपलब्ध राहील.

(१) जिल्हाधिकारी, नागपूर.

(२) सहसंचालक, नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर.

(३) सहायक संचालक, नगर रचना, शाखा कार्यालय, नागपूर.

उक्त मंजूर फेरबदल हा सदर अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचे दिनांकापासुन अंमलात येईल.

सदर सूचना **www.maharashtra.gov.in** व **www.dtp.maharashtra.gov.in** या वेबसाईट वर देखील उपलब्ध आहे.

**विजय बा. शेंडे,**
सदस्य सचिव,
प्रस्ताव छाननी समिती,
तथा
सहसंचालक, नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर.

नागपूरः
दिनांक १७ ऑक्टोबर, २०२५.

---

भाग १-अ(ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३२४.

BY MEMBER SECRETARY, PROPOSAL SCRUTINY COMMITTEE AND
JOINT DIRECTOR, TOWN PLANNING

NOTIFICATION U/S 20(4) OF MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966

*NOTIFICATION*

No.Section 20(4)-R.P Nagpur-Mouza Parsodi (Uti)-Tah. Umred-Survey No. 22/1 (Part), 22/2 (Part), 22/3, 22/4, 22/5, 22/6, 22/7 & 23 (Part)-JDTPDN-1646-2025.–

Whereas, the Revised Regional Plan of Nagpur Region (hereinafter referred to as "the said Regional Plan") has been sanctioned by the Government *vide* Urban Development Department's Notification No. TPS-2496-1505-CR-273-96-UD-9, dated 6th May, 2000 under section 15 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maha. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") and came into force with effect from 15th July, 2000;

And whereas, the Government *vide* Resolution No.TPS 1815-CR-49-15-UD-13, dated 6th May, 2015 issued directives u/s 154 of the said Act regarding the procedure to be followed under Section 20 of the said Act for making changes in the use of land in the areas of sanctioned Regional Plans under the said Act and issued order to follow revised procedure related to above directives *vide* Govt. Resolution No.TPS-1815-CR-49-15-UD-13, Dated-04.01.2016; and in exercise of the powers conferred by sub- section (1) of section 151 of the said Act, the Government, *vide* its notification No.TPS-1815-CR-49-15- UD-13; Dated 06.05.2015, delegated the powers exercisable by it under the provisions of section 20(*3*) & 20(*4*) of the said Act, subject to conditions mentioned therein, to the Divisional Joint Director of Town Planning for Nagpur Administrative Division;

And whereas, land bearing Survey No. 22/1(Part), 22/2 (Part), 22/3, 22/4, 22/5, 22/6, 22/7 & 23(Part) of Mouza-Parsodi (Uti), Tah. Umred, District-Nagpur total land admeasuring approx. 14.98 hectare (hereinafter referred to as "the said Area") is included in 'Agriculture/Horticulture Zone' of proposed Land Use Plan in the said sanctioned Regional Plan of Nagpur;

And whereas, the "Proposal Scrutiny Committee" established under the above mentioned Government Resolution, after consulting to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of opinion that the said area is to be deleted from "Agriculture/Horticulture Zone" and to be included in "Residential Zone" in accordance with the provision of sub section (2) of section 20 of said Act, subject to certain terms and conditions;

And whereas, in pursuant to the above, a notice bearing No. R.PNagpur/Section 20(3)/Mouza Parsodi (Uti)/Tah. Umred/ Survey No. 22/1(Part), 22/2 (Part), 22/3, 22/4, 22/5, 22/6, 22/7 & 23(Part)/JDTPDN/222, Dated 12/02/2025 regarding the proposed modification under sub section (3) of the Section 20 of the said Act, was published by Joint Director of Town Planning, Nagpur Division, Nagpur which appeared in the Maharashtra Government Official Gazette, Part-1-A Nagpur Division dated February 27-March 05, 2025 on Page No. 9 to 11 and the same was also published in the Marathi Newspaper 'Yuvarashtra Darshan' dated 05/03/2025 & English Newspaper 'The Lokmat Times' dated 05/03/2025 for inviting suggestions and/or objections from the general public and the Assistant Director of Town Planning, Nagpur Branch, Nagpur, was appointed as an 'Officer' (hereinafter referred to as the " said Officer") to hear suggestions and/or objections and submit his report to the undersigned;

And whereas, no suggestions and/or objections are received within prescribed time limit as per the report submitted by the said Officer, And whereas "Proposal Scrutiny Committee" meeting held on dated 15.07.2025 and the decision was taken to delete the said land, from the "Agriculture/ Horticulture Zone" and to include in the "Residential Zone" subject to certain terms and conditions;

And whereas, the owner of land bearing Survey No. 22/1(Part), 22/2 (Part), 22/3, 22/4, 22/5, 22/6, 22/7 & 23 (Part) of Mouza-Parsodi (Uti), Tah. Umred, District-Nagpur total area 14.98 hectare has deposited necessary premium in the Government Treasury in this regard;

Now therefore, in exercise of the powers delegated by the Government the Joint Director of Town Planning, Nagpur Division, Nagpur hereby sanctions the proposed modification under sub-section 4 of section 20 of the said Act & for that purpose directs that in the Schedule of Modifications appended to the Notification dated 6th May, 2000 sanctioning the said Regional Plan, after the last entry, the following new entry shall be added;

*ENTRY*

The land bearing Survey No. 22/1 (Part), 22/2 (Part), 22/3, 22/4, 22/5, 22/6, 22/7 & 23 (Part) of Mouza-Parsodi (Uti), Tah.Umred, District-Nagpur, total Area 14.98 hectare "is deleted from Agriculture/Horticulture Zone and included in Residential Zone" more specifically shown on Plan. Following terms and conditions will be applicable.

*Terms & Conditions:*

(i) It is mandatory to provide 10% Amenity Space and 10% Open Space in the layout as required by the provision for Regional Plan in Unified Development Control & Promotion Regulations (UDCPR).

(ii) It will be the responsibility of the land Owners/Developers to provide sufficient water as required by the potential population on the said land. In this regard, as per the letter No. 2007, dated 31-12-2024 from the Senior Geologist Groundwater Survey and Development Agency, Nagpur, it is stated that at Survey No. 22/2 there is one 'existing well' located on the Bank of the Nallah. From the said well, approximately 3 Lakhs litre/day of groundwater would be made available. It is further mentioned that by providing 4-6 horizontal bores in the said well and by constructing 1 new Borewell around 4-4.5 Lakhs litre/day would be made available. Hence the final Lay-out shall be sanctioned only after when the applicant fulfils this condition and due verification by District Collector, Nagpur.

(iii) It will be binding upon land Owners/ Developers to Develop and provide basic Amenities at their own cost as per the specifications decided by the Collector Nagpur.

(iv) Following Conditions prescribed for the sale of plot/ flat with the development of basic amenities in layout mentioned in the affidavit, in the proforma 'Schedule-C' (Annexure of Govt. resolution dated 06-05-2015) submitted with the application shall be applicable.—

| | | |
|---|---|---|
| (A) | After final sanction of Lay-out | Sale of 25% plot/flat will be permissible |
| (B) | After completion of approx. 40% Basic Amenities | Sale of 50% plot/flat will be permissible |
| (C) | After completion of approx. 60% Basic Amenities | Sale of 75% plot/flat will be permissible |
| (D) | After completion of approx. 80% Basic Amenities | Sale of 90% plot/flat will be permissible |
| (E) | After completion of approx. 100% Basic Amenities | Sale of 100% plot/flat will be permissible |

(v) If a group housing scheme is to be developed on the land under modification proposal, occupancy certificate shall not be issued to the Land owner/Developers unless all basic Amenities are developed as prescribed by the Collector, Nagpur.;

The copy of part plan showing the above sanctioned modification shall be kept open for inspection by general public during office hours on all working days for a period of one month at the following offices;

(1) The Collector, Nagpur.

(2) The Joint Director of Town Planning, Nagpur Division, Nagpur.

(3) The Assistant Director of Town Planning, Nagpur Branch, Nagpur.

The above modification will come into force after the date of publication of this notification in the *Maharashtra Govt. Gazette.*

This notification is also available on website *www.maharashtra.gov.in* and *www.dtp.maharashtra.gov.in*

VIJAY B. SHENDE,

Member Secretary,
Proposal Scrutiny Committee
And
Joint Director, Town Planning,
Nagpur Division, Nagpur.

Nagpur:
Dated the 17th October, 2025.

भाग १-अ( ना. वि. पु. ) म. शा. रा., अ. क्र. ३२५.

## प्रशासक, नगर परिषद, यांजकडून

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१ (२), कलम २३ (१ व २) व कलम ३८ च्या अनुषंगाने कळमेश्वर-ब्राम्हणी नगरपरिषद क्षेत्राची (मूळ हद्द दु.सु. + वा.क्षे.) विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणेबाबत**

**सूचना**

क्रमांक नपक-ब्रा.-३०८८-२०२५.—

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे तरतुदीनुसार तयार केलेली कळमेश्वर शहराची सुधारित विकास योजना मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अधिसूचना क्रमांक वी.यो. कळमेश्वर (आर + ए.ए.)/टी. पी. व्ही.-२/४२८७ दिनांक २१ जुलै, १९९२ रोजी मंजूर करण्यात आली आणि ती दिनांक ०१ ऑक्टोबर, १९९२ पासून अंमलात आली.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३८ मधील तरतुदीनुसार व कलम २३ (१) नुसार कळमेश्वर नगरपरिषदेच्या अधिकार कक्षेतील क्षेत्रासाठी कळमेश्वर शहराची दुसरी सुधारीत योजना तयार करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एमयूएन २०१६ / प्र.क. २०६ /नवि- १८ दिनांक ११-१०-२०१७ मंत्रालय, मुंबई अन्वये कळमेश्वर नगर परिषदेची हद्दीवाढ बाबत अंतिम अधिसूचना प्रसिध्द होवून मौजा ब्राम्हणीचे संपूर्ण क्षेत्र नगर परिषद कळमेश्वर हद्दीमध्ये समाविष्ट होवून नगर परिषदेची हद्दवाढ मंजूर करण्यात आलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१ (२) अन्वये नगरपरिषद क्षेत्राचा नियोजनबध्द विकास होण्यासाठी (वाढीव हद्दीसाठी मूळ योजना) विकास योजना तयार करणे आवश्यक आहे.

सबब, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१ (२), कलम २३ (१) व कलम ३८ च्या अनुषंगाने कळमेश्वर - ब्राम्हणी नगरपरिषद क्षेत्राकरिता विकास योजना (दु.सु. + वा.क्षे.) तयार करण्याचा इरादा जाहीर करण्यासाठी सर्वसाधारण सभेचा ठराव क्रमांक ०३, दिनांक २७-१०-२०२५ अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार सदरची सूचना प्रसिध्द करण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३ ( २ ) नुसार कळमेश्वर नगरपरिषदेस तयार करावयाच्या मूळ हद्द (दुसरी सुधारित) व तद्नंतरच्या वाढीव हद्दीची विकास योजना अशा एकत्रित विकास योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राचा हद्द दर्शविणारा प्रशासक तथा मुख्याधिकारी यांनी स्वाक्षांकित केलेला नकाशा नगरपरिषदेच्या कार्यालयात, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात आलेला आहे.

कळमेश्वर-ब्राम्हणी नगरपरिषदेकडून इरादा जाहीर करण्यात आलेल्या मूळ हद्द (दुसरी सुधारित) व वाढीव हद्दीची विकास योजना अशा एकत्रित विकास योजनेच्या अनुषंगाने ज्या नागरिकांच्या याबाबत काही सूचना/हरकती द्यावयाच्या असतील त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द होईल त्या तारखेपासून ६० (साठ) दिवसांच्या आत मुख्याधिकारी, कळमेश्वर-ब्राम्हणी, नगरपरिषद यांचेकडे लेखी स्वरूपात व पृष्ठार्थ योग्य त्या कागदपत्रासह सादर कराव्यात. वरील विकास योजना तयार करतांना त्या सूचना/हरकतींचा योग्य तो विचार नगर परिषदेकडून करण्यात येईल.

**आकाश सुरडकर,**
प्रशासक,
नगर परिषद, कळमेश्वर-ब्राम्हणी.

कळमेश्वर-ब्राम्हणी :
दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२५.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३२६.

BY ADMINISTRATOR, MUNICIPAL COUNCIL

**Declaration of Intention to prepare Development Plan of Kalmeshwar-Bramhni (2nd Rivised of Origional limit + Extended limit) Municipal Council as per Section 21(2), Section 23 (1 and 2) and Section 38 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**

*NOTICE*

NO. MCK.-B.-3088-2025.—

Revised Development Plan of Kalmeshwar Town prepared under the provisions of Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966 Hon'ble, Director, Town Planning, State of Maharashtra, Pune Notification No. D.P. Kalmeshwar (R+ AA)/T.P.V. 2/4287 dated 21st July, 1992 was approved and came into force from 01st October 1992.

As per the provisions of Section 38 of the Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966 and Section 23 *(1)*, it is necessary to prepare a Second Revised Plan of Kalmeshwar City for the area under the jurisdiction of Kalmeshwar Municipal Council.

Maharashtra Government, Urban Development Department, Government Decision M.U.N.-2016/L.No.206/ Navi-18 dated 11-10-2017, Ministry, Mumbai Final notification regarding the extension of the Kalmeshwar Municipal Council has been published and the entire area of Mouja Bramhni has been included in the Kalmeshwar Municipal Council and the extension of the Municipal Council has been approved. Accordingly, under Section 21 *(2)* of the Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966, it is necessary to prepare a Development Plan (basic plan for the extended area) for the planned development of the Municipal Council area.

Hence, the Kalmeshwar-Bramhni Municipal Council by its Resolution No. 03, dated 27-10-2025 has given consent to declare its intention to prepare Development Plan (S.R.+AA), as per provision of Section 21*(2)*, Section 23(*1*) and Section 38 of the Maharashtra Regionai and Town Planning Act, 1966. Accordingly, this notice is being published.

The plan signed by the Administrator and the Chief Officer showing 2nd Rivised of origional limit of the area included in Development Plan for the subsequent extended area of Kalmeshwar-Bramhni, Municipal Council is kept open for inspection by the public on office working days, during office hours at the office of the Municipal Council, as required under section 23(*2*) of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.

Any suggestion/objection of the public in this regard, may be forwarded in writing to the Chief Officer, Kalmeshwar-Bramhni Municipal Council within a period of 60(Sixty) days from the date of publication of this notice in *Maharashtra Government Gazette.* The suggestion/objection shall be duly considered while preparing the Development Plan.

AKASH SURADKAR,

Kalmeshwar-Bramhani:

Administrator,

Dated the 31st October, 2025.

Municipal Council, Kalmeshwar-Bramhni.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.